# प्रेस नोट ता. ०६/०७/२०१९

## दुकानातील सिगारेटचे बॉक्स चोरी करुन रस्त्यावर विकणा-या दोन इसमांना अटक

पुणे शहरातील वाहन चोरी, जबरी चोरी व घरफोडी चोरीच्या गुन्हयास प्रतिबंध करुन, चोरीचे गुन्हे उघडकीस आणण्याकरीता मा. सुनिल फुलारी, अप्पर पोलीस आयुक्त सो, पुर्व प्रादेशिक विभाग पुणे व मा. सुहास बावचे, पोलीस उप आयुक्त सो, परिमंडळ ५ पुणे शहर यांचे मार्गदर्शनाखाली व मा. सुनिल देशमुख, सहाय्यक पोलीस आयुक्त सो, हडपसर विभाग पुणे यांचे सुचनानुसार वरिष्ठ पोलीस निरीक्षक रघुनाथ जाधव यांचेकडून हडपसर पोलीस स्टेशनच्या हददीतील चोरीच्या गुन्हयास आळा बसविण्याकरीता विशेष मोहिम राबविण्यात आली आहे.

त्या अनुषंगाने हडपसर पोलीस स्टेशन हददीत गुन्हे प्रतिबंधक पेट्रोलींग करीत असताना पोलीस नाईक, ब. नं. २८०० गायकवाड यांना गोपनीय बातमी मिळाली की, रविदर्शन, हडपसर येथे फुटपाथवर दोन इसम येणा-या जाणा-या लोकांना थांबवुन त्यांचेकडील सिगारेटचे बॉक्स विकण्याचा प्रयत्न करीत आहेत अशी बातमी मिळाल्याने हडपसर पोलीस स्टेशनकडील तपास पथकातील अधिकारी व कर्मचारी यांनी रविदर्शन, हडपसर, पुणे येथे जावुन पाहणी केली असता बातमीतील वर्णनाचे दोन इसम रविदर्शन जवळील फुटपाथवर थांबलेले दिसले. तेव्हा मिळालेली बातमी खरी असल्याची खात्री झाल्याने सापळा रचुन त्यांचे जवळ जात असताना ते पळुन जावु लागले. तेव्हा त्यांचा पाठलाग करुन थोडयाच अंतरावर इसम नामे १) हनुमंत भगवान दुर्गे, वय ३३ वर्षे, रा. मु.पो. सोरतापवाडी, साईदत्त नगर, जुने कॅनॉल शेजारी, वायकर वस्ती जवळ, ता. हवेली, जि. पुणे व २) अभिषेक नितीन बकरे, वय १९ वर्षे, रा. मगरआळी, शिवराज चौक, हडपसर गांव, पुणे यांना पकडले असता त्यांचेकडील पिशवी मध्ये एकुण १८ वेगवेगळया कंपन्याचे व किंमतीचे सिगारेटचे बॉक्स मिळुन आल्याने ते ताब्यात घेण्यात आले आहे.

ताब्यात घेण्यात आलेले इसम नामे १) हनुमंत भगवान दुर्गे २) अभिषेक नितीन बकरे हे या पुर्वी किराणा मालाचे दुकानात काम करीत होते. थोडया दिवसातच त्यांनी ते काम सोडले होते. त्यानंतर त्यांनी दुकानाजवळ थांबुन दुकानदारावर पाळत ठेवुन दुकानातील वेगवेगळया कंपन्याचे व किंमतीचे सिगारेटचे बॉक्स चोरी करुन विकण्याचा प्रयत्न करीत होते.

इसम नामे १) हनुमंत भगवान दुर्गे, वय ३३ वर्षे, रा. मु.पो. सोरतापवाडी, साईदत्त नगर, जुने कॅनॉल शेजारी, वायकर वस्ती जवळ, ता. हवेली, जि. पुणे व २) अभिषेक नितीन बकरे, वय १९ वर्षे, रा. मगरआळी, शिवराज चौक, हडपसर गांव, पुणे यांना हडपसर पोलीस स्टेशन गुन्हा रजि नं. ६१३/२०१९ भा.द.वि. कलम ३८० मध्ये अटक करण्यात आली असुन त्यांचे ताब्यातुन एकुण १८ वेगवेगळया कंपन्याचे व किंमतीचे सिगारेटचे बॉक्स असा एकुण ६०,०००/- रुपये किंमतीचा चोरीचा मुददेमाल जप्त करण्यात आला आहे.

सदरची कामगिरी मा. सुनिल फुलारी, अप्पर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग पुणे व मा. सुहास बावचे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ५ पुणे शहर यांचे मार्गदर्शनाखाली मा. वरिष्ठ पोलीस निरीक्षक रघुनाथ जाधव, पोलीस निरीक्षक हमराज कुंभार यांचे सुचनानुसार सहा. पोलीस निरीक्षक संजय चव्हाण, पोलीस उपनिरीक्षक तुषार पाचपुते, पो.हवा. ८२३ युसुफ पठाण, पो.हवा. ३८६८ सपंत औचरे, पो.हवा. ५५६२ राजेश नवले, पो.ना. २८०० प्रताप गायकवाड, पो.ना. ६४८९ विनोद शिवले, पो.ना. ६८७० सैदोबा भोजराव, पो.ना. ५७९१ राजु वेगरे, पो.ना. ५८५३ गणेश दळवी, पो.शि. १०१५ अनिल कुसाळकर, पो. शि. ८६९२ अकबर शेख, पो. शि. ७५१२ गोविंद चिवळे, पो.शि. ७६८४ शंशिकांत नाळे, पो.शि. ८३७६ अमित कांबळे, पो.शि. ४७९ शाहीद शेख, पो.शि. ८७६१ ज्ञानेश्वर चित्ते यांनी केली आहे.